ePaper


## शरद पवार आमचे महादजी शिंदे... संजय राऊत यांची पवारांसमोरच टोलेबाजी

| वर्ष - 8 | अंक - 217 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 21 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



### आतील पानांत

- चॅम्पियन्स ट्रॉफीत 'शुभ' सुरूवात
- 'कुछ तो लोग कहेंगे
- रेखा गुप्ता दिल्लीची मुख्यमंत्री!
- कोकाटेंची आमदारकी धोक्यात?

## लाडक्या बहिणींची मोठी फसवणूक

# गरज सरो वैद्य मरो...

### विजय वडेट्टीवारांची महायुती सरकारवर टीका

**नागपूर । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**निवडणुकीपूर्वी ॲडव्हान्स देणारे महायुती सरकार लाडक्या बहिणींची संख्या कमी करत आहे. 'गरज सरो, वैद्य मरो', अशी फसवणूक राज्यकर्त्यांनी सुरू केली, असा हल्ला काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी चढवला. निवडणुकीपूर्वी मत विकत घेण्यासाठी लाडक्या बहिणींना पैसे देण्यात आले.**



सत्तेत आल्यानंतर विविध अटी लादून लाभार्थी महिलांची संख्या कमी केली जात आहे. ही संख्या २५ टक्केपर्यंत आणण्याचे महापाप करणाऱ्या सरकारला त्यांची जागा बहिणीच दाखवतील, असा इशाराही वडेट्टीवार यांनी गुरुवारी नागपुरात पत्रकारांशी बोलताना दिला. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळातील निर्णयांची चौकशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केली. याचाच अर्थ महायुतीत मतभेद असल्याचे स्पष्ट होते. महायुतीचा कारभार स्वच्छ करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी करून एकनाथ शिंदे यांच्या निर्णयांपासून त्याची सुरुवात केली, असा टोलाही वडेट्टीवार यांनी लगावला. महायुतीच्या नेत्यांनी शेतकरी, महिलांना पोकळ आश्वासने दिली. परस्परांशी भांडून जनतेच्या कळीच्या प्रश्नावर विचलित केले जात आहे. मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर अंजली दमानिया यांनी केलेल्या आरोपांची मुख्यमंत्र्यांनी चौकशी करावी, या मागणीचा विजय वडेट्टीवार यांनी पुनरुच्चार केला.

### 'महायुतीमध्ये मतभेद'

'एकनाथ शिंदे यांनी जे निर्णय घेतले त्याची चौकशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत आहे. हे महायुतीमधील मतभेद आहेत. महायुती सरकारचा कारभार स्वच्छ असणार असा नारा मुख्यमंत्र्यांनी दिला, त्याची सुरुवात एकनाथ शिंदे यांच्या निर्णयापासून झाली आहे. महायुती सरकारमध्ये कुरघोडीचे राजकारण जोरात सुरू आहे. लोकांना मात्र वाऱ्यावर सोडले गेले आहे, असा आरोपही वडेट्टीवार यांनी केला.'

### आरोपी मंत्र्यांची पाठराखण

उद्योगी व तेजस्वी नेते महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात असल्याने सरकारची रोज लाज निघत आहे. आरोप होत आहेत, न्यायालयाकडून शिक्षेचे आदेश दिले जात आहेत. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री आरोपी मंत्र्यांना स्वतः क्लीनचिट देऊन पाठराखण करत आहेत, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी समाजमाध्यमांतून कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेवर केली.

## पुण्यात महापालिकेचे पाणीही पिण्यास अयोग्य!

### तपासणीत जीवाणूंसह विषाणू आढळले; पाणी तपासणी मोहीम सुरु

**पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**सिंहगड रस्ता परिसरात गुइलेन बॅरे सिंड्रोमचा उद्रेक झाल्यानंतर महापालिकेने पाणी तपासणी मोहीम हाती घेतली. या परिसरातील पाण्याचे नमुने तपासणीसाठी विविध ठिकाणी पाठविण्यात आले. यातून आता महापालिकेच्या पाणीपुरवठ्यासह खासगी टँकर आणि रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) प्रकल्पांचे पाणीही पिण्यास अयोग्य असल्याचे समोर आले आहे. सिंहगड रस्ता परिसरातील ७० पाणी नमुन्यांमध्ये जीवाणंसूह विषाणू आढळले आहेत.**



जीबीएसचा उद्रेक झालेल्या सिंहगड रस्ता परिसरातील महापालिकेकडून पुरवठा सुरू असलेल्या पाण्याचे १ हजार ६१८ नमुने पाणीपुरवठा विभागाने पर्वती जलकेंद्रात तपासले. त्यातील १२ नमुने पिण्यास अयोग्य आढळले. त्यात कॉलिफॉर्म आणि ई-कोलाय हे जीवाणू आढळले. याचबरोबर या परिसरातील खासगी टँकरमधील पाण्याचे १८ नमुने पर्वती जलकेंद्रात तपासण्यात आले. त्यातील १५ नमुने पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल आला असून, अद्याप ३ नमुन्यांचा अहवाल प्रलंबित आहे. तसेच, या परिसरातील ३६ आरओ प्रकल्पांचे पाणी नमुने तपासण्यात आले. त्यातील २३ पाणी नमुने पिण्यास अयोग्य असल्याचे निष्पन्न झाले, अशी माहिती आरोग्य विभागातील सूत्रांनी दिली.

### 206 पाणी नमुने तपासणीसाठी पाठवले...

सिंहगड रस्ता परिसरातील २०६ पाणी नमुने राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत (एनआयव्ही) पाठविण्यात आले. त्यातील ६ नमुन्यांमध्ये नोरोव्हायरस हा विषाणू आढळला आहे. याच वेळी एका नमुन्यात कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी हा जीवाणू आढळला असून, हा नमुना किरकिटवाडीतील मोरया सोसायटीतील नळाच्या पाण्याचा होता. याचबरोबर सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेने सिंहगड रस्ता परिसरातील ४३ पाणी नमुने तपासले. त्यात १३ नमुने पिण्यास अयोग्य आढळले असून, त्यातील ६ नमुन्यांमध्ये ई-कोलाय आणि ९ नमुन्यांमध्ये कॉलिफॉर्म जीवाणू आढळले आहेत. नांदेड विहीर, निसर्ग हाईट्स विहीर आणि डीएसके विश्व पाण्याची टाकीतील हे नमुने होते, असे सूत्रांनी सांगितले.

# पालिका म्हणते, जलपर्णी काढा!

## आरोग्य विभागाद्वारे कीटकनाशक औषधांची फवारणी बेबी कॅनॉलमध्ये सुरू

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हडपसर परिसरातील बेबी कॅनॉलमध्ये जलपर्णीची वाढ झाली आहे. यामुळे तिथे मोठ्या प्रमाणात डासोत्पत्ती होऊन साथरोगांचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाने जलसंपदा विभागाला जलपर्णी काढण्याबाबत पत्र दिले होते.**



मात्र, बेबी कॅनॉलमधील जलपर्णी आणि कचरा हा महापालिकेमुळे झाला असल्याने त्यांनीच तो स्वच्छ करावा, अशी भूमिका जलसंपदा विभागाने घेतली आहे. यामुळे जलपर्णी काढायची कोणी, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत बेबी कॅनॉल आहे. हा बेबी कॅनॉल साडेसतरा नळी, अन्सारी फाटा, महादेवनगर, घुले वस्ती, कल्पतरू सोसायटी, अमर सृष्टी, लक्ष्मी कॉलनी, विठ्ठलनगर, मांजरी, फुरसुंगी, शेवाळवाडी आणि सायकरवाडी या परिसरातून जातो.

या कॅनॉलमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाढली आहे. कचराही मोठ्या प्रमाणात साचला आहे. जलपर्णीमुळे परिसरात डास वाढल्याच्या तक्रारी आरोग्य विभागाकडे सातत्याने येत आहेत. साथरोगांचा धोकाही त्यामुळे वाढला आहे.आरोग्य विभागाने कीटकनाशक औषधांची फवारणी बेबी कॅनॉलमध्ये सुरू केली. मात्र, जलपर्णीमुळे औषधफवारणीचा फारसा उपयोग होत नसल्याचे निदर्शनास आले.

या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने जलसंपदा विभागाला २ जानेवारी रोजी पत्र पाठविले. त्यात बेबी कॅनॉलमधील जलपर्णी काढावी, अशी मागणी करण्यात आली. यावर जलसंपदा विभागाने कॅनॉलमधील जलपर्णी न काढण्याची भूमिका घेतली आहे.जलसंपदा विभागाने महापालिकेला पत्र लिहिले असून, त्यात तेथील वस्तुस्थितीदर्शक अहवाल मांडला आहे. त्यात म्हटले आहे की, कॅनॉलच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. त्यामध्ये जास्त प्रमाण झोपड्यांचे आहे. नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात कचरा व राडारोडा कॅनॉलमध्ये टाकला जात आहे. त्यामुळे त्यात घाणीचे प्रमाण मोठे आहे. कॅनॉलच्या दोन्ही बाजूंनी यापूर्वी केलेली संरक्षण जाळीही नागरिकांनी तोडली आहे. जलसंपदा विभागाकडे कॅनॉल स्वच्छतेसाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रे उपलब्ध नाहीत.

महापालिकेकडून कचरा व्यवस्थापनाचे नियोजन नसल्याने कालवा कायमस्वरूपी सुस्थितीत आणि स्वच्छ ठेवणे शक्य नाही. हडपसर परिसरातील बेबी कॅनॉलमध्ये मोठ्या प्रमाणात जलपर्णी असून, त्यामुळे डासांची उत्पत्ती वाढली आहे. यातून साथरोगांचा धोका निर्माण झाला आहे. याचबरोबर तेथील नागरिकांकडूनही वारंवार डासांच्या वाढत्या प्रादुर्भावाबाबत तक्रारी येत आहेत. जलसंपदा विभागाला दोन महिन्यांपूर्वी पत्र पाठवूनही कार्यवाही झालेली नाही.

### कॅनॉलच्या दोन्ही बाजूला संरक्षक जाळी

बेबी कॅनॉलमध्ये कचरा टाकला जाऊ नये, यासाठी पुणे महापालिकेने उपाययोजना करायला हव्यात. त्या परिसरात कचराकुंड्या ठेवल्यास कचरा कॅनॉलमध्ये टाकला जाणार नाही. याचबरोबर महापालिकेने कॅनॉलच्या दोन्ही बाजूला संरक्षक जाळी बसविण्यासाठी कार्यवाही करायला हवी. कॅनॉलची स्वच्छता आणि सुरक्षेची कार्यवाही महापालिकेनेच करावी.या कॅनॉलमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाढली आहे. कचराही मोठ्या प्रमाणात साचला आहे. जलपर्णीमुळे परिसरात डास वाढल्याच्या तक्रारी आरोग्य विभागाकडे सातत्याने येत आहेत. साथरोगांचा धोकाही त्यामुळे वाढला आहे.आरोग्य विभागाने कीटकनाशक औषधांची फवारणी बेबी कॅनॉलमध्ये सुरू केली. मात्र, जलपर्णीमुळे औषधफवारणीचा फारसा उपयोग होत नसल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने जलसंपदा विभागाला २ जानेवारी रोजी पत्र पाठविले. त्यात बेबी कॅनॉलमधील जलपर्णी काढावी, अशी मागणी करण्यात आली. यावर जलसंपदा विभागाने कॅनॉलमधील जलपर्णी न काढण्याची भूमिका घेतली आहे.

# हिंजवडी वाहतूक कोंडीमुक्तीच्या दिशेने पाऊल

## म्हाळुंगे ते हिंजवडी टप्पा 1 मधील रस्ता विकसित केला जाणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडी आयटी पार्कसह पुण्यातील विविध एमआयडीसीमध्ये वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. वाढते नागरीकरण आणि उद्योगांचा विस्तार होऊनही पायाभूत सुविधा न वाढल्यामुळे वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. अखेर ही समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक पाऊल पडले आहे.**



हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या कायम चर्चेत असते. याचबरोबर पुण्यातील विविध औद्योगिक क्षेत्रांमधील (एमआयडीसी) वाहतुकीची समस्याही वारंवार प्रकर्षाने समोर येते. आयटी पार्कसह औद्योगिक क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा दररोज सरासरी एक तास वाहतूककोंडीत वाया जातो.

कर्मचाऱ्यांचा एक तास अनुत्पादक जातो ही एकमेव बाब नसून, त्याचे अनेक गंभीर परिणाम उद्योगांवर होत आहेत. उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा होण्यास आणि त्यांचे उत्पादन बाजारपेठेत पोहोचण्यास विलंब या गोष्टींचाही फटका उद्योगांना बसत आहे. यामुळे एकूण उद्योगांच्या अर्थकारणालाच झळ बसविणारी ही कोंडी सोडविण्यासाठी आता पावले उचलली जात आहेत. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी औद्योगिक क्षेत्रांना राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांशी जोडण्याचा प्रस्ताव मांडला आहे. यात हिंजवडी आयटी पार्क, रांजणगाव औद्योगिक क्षेत्र आणि पिरंगुट औद्योगिक क्षेत्राचा समावेश आहे. या तिन्ही औद्योगिक क्षेत्रांमध्ये महामार्गांशी थेट जोडणारे विविध रस्ते प्रस्तावित केले आहेत.रांजणगाव औद्योगिक क्षेत्रात पिंपरी दुमाला राज्य मार्ग ते ढोकसांगवी ते शिरूर ग्रामीण राज्य मार्गाला जोडणाऱ्या प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्याची सुधारणा केली जाणार आहे. या रस्त्याची लांबी १२ किलोमीटर असून, त्यासाठी १९.९० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. पुणे-शिरूर राष्ट्रीय महामार्गापासून ढोकसांगवी ते निमगाव भोगी ते मलठण राज्य मार्गाला जोडणारा प्रमुख जिल्हा मार्ग बांधण्यात येणार आहे.

### रस्त्याची लांबी 10 किलोमीटर

या रस्त्याची लांबी १० किलोमीटर असून, यासाठी १८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. अहमदाबाद राज्य मार्ग ते निमगाव भोगी ते सोनेसांगवी राज्य मार्ग ते प्रमुख जिल्हा मार्ग बांधण्यात येईल. या रस्त्याची लांबी ९ किलोमीटर असून, १८ कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे. शिरूर तालुक्यातील करडे ते निमोणे या प्रमुख जिल्हा मार्गाचे काम करण्यात येणार आहे. हा मार्ग ९ किलोमीटरचा असून, त्यासाठी १२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.हिंजवडी आयटी पार्कमध्ये म्हाळुंगे ते हिंजवडी पहिला टप्पा १ मधील रस्ता विकसित केला जाणार आहे.

## पिंपरी-चिंचवडमधील लघु उद्योजकांना

# लोकप्रतिनिधी-प्रशासनाचा ‘विश्वास’!

### मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या बैठकीत सकारात्मक भूमिका

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कारखानदारी, लघुउद्योग ही पिंपरी-चिंचवड शहराची प्रमुख ओळख आहे. या उद्योग क्षेत्राचा शहराच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. उद्योग, उद्योजक यांच्या पुनर्वसनासाठी लवकरच “अॅक्शन प्लॅन” बनवण्यात येईल. शहरातील लघु उद्योजकांवर अतिक्रमण कारवाई होणार नाही, असा विश्वास लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांनी दिला आहे.**

#### आ. महेश लांडगे आणि महापालिका अधिकाऱ्यांची उपस्थिती



मराठा चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे पिंपरी-चिंचवड येथील कार्यालयात बैठक झाली. या बैठकीला भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे उपस्थित होते. यावेळी मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष दीपक करंदीकर, महापालिका उपायुक्त मनोज लोणकर, क .क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, फ क्षेत्रीय अधिकारी श्रीकांत कोळप, प्रकाश गुप्ता, गोरख भोरे उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, कुदळवाडी-चिखली येथील अतिक्रमण कारवाईबाबत प्रशासनासोबत बैठक झाली होती. त्यावेळी रस्ते आणि आरक्षणांमध्ये अडथळा ठरणारी, इंद्रायणी नदी प्रदूषण, वायू-ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरणारी आणि अनधिकृत भंगार व्यावसायिकांवर कारवाई करण्याचे निश्चित केले होते. पण, प्रशासानाने सरसकट कारवाई केली. त्यामुळे लघु उद्योजक आणि भूमिपुत्रांचे नुकसान झाले आहे. उद्योग, उद्योगक्षेत्र आणि उद्योजक यांच्या सर्व समावेशक विकासासाठी नेहमीच पाठीशी राहण्याची भूमिका भाजपा आणि आमची आहे. यासाठी लवकरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहोत, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

#### .. अशा आहेत उद्योजकांच्या मागण्या!

1. चिखली कुदळवाडी येथील कारवाई झालेल्या उद्योजकांना तात्पुरत्या स्वरूपात मशीन, कच्चामाल तसेच इतर साहित्य ठेवण्यासाठी सोय करावी.
2. महापालिकेच्या डीपी प्लॅन नुसार आरक्षण असतील तर ते विकसित करण्यासाठी मराठा चेंबर सहकार्य करेल.
3. वर्षानुवर्ष लघु उद्योजकांचा पिंपरी चिंचवड शहराच्या विकासात मोलाचा सहभाग आहे. त्यांना त्रास न होण्यासाठी उपाययोजना किंवा अॅक्शन प्लॅन तयार करावा.

“ मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अधिकारी आणि आमची संयुक्त बैठक झाली. कुदळवाडीप्रमाणे सरसकट कारवाई करुन लघुउद्योजक व भूमिपुत्रांना नाहक त्रास होईल, अशी कारवाई प्रशासनाने करु नये, अशी ठाम भूमिका आम्ही प्रशासनासमोर मांडली. उद्योग क्षेत्रासाठी शहरात सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे. नियम-अटी आणि विविध परवानग्यांसाठी महापालिका प्रशासन सर्वोतोपरी सहकार्य करणार आहे. शहरातील कोणत्याही उद्योगाला कुदळवाडीप्रमाणे त्रास होवू नये. यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची जबाबदारी मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, महापालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही घेतली आहे.

**–महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

## आरोप सिद्ध झाल्यास मुख्यमंत्री योग्य निर्णय घेतील!

### आदिती तटकरे : मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर होत असलेल्या आरोपाबाबत प्रतिक्रिया

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडी आयटी पार्कसह पुण्यातील विविध एमआयडीसीमध्ये वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. वाढते नागरीकरण आणि उद्योगांचा विस्तार होऊनही पायाभूत सुविधा न वाढल्यामुळे वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. अखेर ही समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक पाऊल पडले आहे.**



अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोप केले जात आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या आरोपांची चौकशी करत आहेत. आरोप सिद्ध झाल्यास मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री योग्य तो निर्णय घेतील असे महिला व बाल कल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी म्हटले आहे. पिंपरी- चिंचवडमध्ये एका खाजगी कार्यक्रमाच्या निमित्ताने आदिती तटकरे आलेल्या असताना त्या प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या. मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर कृषी खात्याशी संबंधित खरेदी प्रकरण आरोप होत आहेत या प्रकरणे विचारले असता त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.


आदिती तटकरे पुढे म्हणाल्या राजकारणात आरोप प्रत्यारो होत राहतात त्यांची चौकशी होऊन कारवाई होणे अपेक्षित आहे. आमची महायुती असल्याने मतमतांतरे असू शकतात. यावर तिन्ही पक्षाचे नेते मार्ग काढतील. यावेळी त्यांनी पालकमंत्री पदाबद्दल प्रतिक्रिया दिली त्या म्हणाल्या, रायगड प्रमाणेच नाशिकच्या पालकमंत्री पदाबाबत तोडगा काढला जाईल. असे निर्णय घेण्यासाठी वेळ लागतो.

#### वॅक्सिन फॉर होप

युवामुलींमधील सर्वायकल कॅन्सरच्या प्रतिबंधासाठी आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलतर्फे एचपीव्ही लशी मोफत पुरवल्या जाणार

पुणे, फेब्रुवारी २०, २०२५–आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल (एबीएमएच) आपल्या ‘वॅक्सिन फॉर होप’या उपक्रमाच्या यशस्वी उद्‌घाटनाची घोषणा अभिमानपूर्वक करत आहे. ह्युमन पॅपिलोमाव्हायरस (एचपीव्ही) लशींच्या माध्यमातून सर्वायकल (गर्भाशयमुखाच) कॅन्सरशी लढण्याच्या उद्दिष्टाने हा समुदायकेंद्री उपक्रम सुरू करण्यात आला आहे. उद्‌घाटन कार्यक्रमाला महाराष्ट्र सरकारमधील महिला व बालविकास खात्याच्या माननीय मंत्री अदिती सुनील तटकरे आणि आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पामेश गुप्ता उपस्थित होते.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### कर्तव्यात परमात्म्याचे स्मरण।

आपले कर्तव्याला न विसरावे । भगवंताचे अनुसंधान राखावे ॥ व्यवहाराने योग्य ते कर्तव्य करीत जावे । बाकी रामावर सोपवावे ॥ कर्तव्यात परमात्म्याचे स्मरण । यातच सिद्धीचे बीज जाण ॥ असा करावा संसार । जेणे राम न होईल दूर ॥

देहाने कर्तव्याची जागृति । त्यात ठेवावी भगवंताची स्मृति । कर्तव्यात असते मनाची शांति ॥ कर्तव्याचा कधी न पडावा विसर । हृदयी धरावा रघुवीर ॥ ऐसे वागेल जो जनी । त्याने जोडला चक्रपाणि ॥ उद्योगाशिवाय राहू नये । कर्तव्याला चुकू नये । पण त्यात रामाला विसरू नये ॥

ठेवावा रामावर विश्वास । कर्तव्याची जागृति ठेवून खास ॥ देहाचा विसर पण भगवंताचे ध्यान । हेच भक्तीचे मुख्य लक्षण ॥ देह करावा रामार्पण । स्वतःचे कर्तेपण सोडून ॥ शास्त्री पंडित विद्वान् झाला । भगवत्पदी न रंगला । व्यर्थ व्यर्थ त्याचे जिणे॥ भगवंतापाशी राहावे रात्रंदिन । हाच सुखाचा उत्तम उपाय जाण ॥ रामाचे चरणी घ्यावी गति । हाच विचार आणावा चित्ती ॥ सुटावी प्रपंचाची आस । तेथे परमात्म्याचे प्रेम खास ॥ सर्व कर्मांत अधिष्ठान असावे देवाचे । तोच कल्याण करील साचे ॥ भले बुरे जे असेल काही । ते सोडावे रामापायी ॥ चित्त असावे रामापायी । देहाने खुशाल संसारात राही ॥ आपण व्हावे रामार्पण । सुखदुःखास न उरावे जाण ॥ धन्य त्याची जननी । ज्याने राम आणिला ध्यानी मनी ॥ रामावीण दुजे काही। आता सत्य उरले नाही ॥ भाव ठेवावा चित्तात । सुखे आयुष्य घालवावे त्याचे सान्निध्यात ॥ ज्याने जिणे केले रामार्पण । त्यासी व्यवहार हेच खरे योगसाधन ॥ माझे सर्व ते रामाचे' । मानून जगात वागणे साचे । अशास नाही कष्ट फार । मागे पुढे रघुवीर ॥ आपण व्हावे मनाने रामाचे । राम जे करील तेच घडेल साचे ॥

चित्त ठेवावे रामापायी । दुजे मनात न आणावे काही ॥ आता न सोडावी हरीची कास । होऊन जावे त्याचे दास ॥ दास्यत्वाचे मुख्य लक्षण । मालकावाचून न दुसऱ्याची आठवण ॥ भगवंताचा दास झाला । जग मानत त्याला ॥ म्हणून आपण सर्व आहो रामाचे दास। हे उरी बाळगावे खास ॥ 'एकच जगती माझा रघुपति' । याहून दुजा न करावा विचार । हाच ठेवावा निर्धार ॥ भाव ठेवता रामापायी । तो कधी कमी पडू देणार नाही ॥ मनाने जावे भगवंताला शरण । जो चुकवील दुःखाचे कारण । राम माझी मातापिता । बंधु सोयरा सखा । तोच माझे सर्वस्वाचे ठिकाणी । याहून दुजा विचार मनात न आणी ।

**बोधवचन:- आता सांभाळावे सर्वांनी आपण। रामाविण जाऊ न द्यावा क्षण॥**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# 'लेडीज फर्स्ट'चा दिला मूलमंत्र, भाजपाचे दिल्लीतही धक्कातंत्र!

**हरियाणा, मध्य प्रदेश, राजस्थान छत्तीसगड येथील मुख्यमंत्री निवडताना भारतीय जनता पार्टीच्या पक्षश्रेष्ठीनी धक्कातंत्र वापरले होते, (अपवाद फक्त महाराष्ट्राचा) तेच आता दिल्लीच्या तख्ताबाबतही वापरले आहे. आधी संघ परिवार आणि नंतर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्याशी वर्षानुवर्ष एकनिष्ठ असणाऱ्या रेखा गुप्ता यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ पडली आहे. अर्थात, भाजपचे अशा प्रकारचे धक्कातंत्र नवीन नाही !**



हा निर्णय घेताना भाजपाने मात्र 'लेडीज फर्स्ट' चा मूलमंत्र देऊन दिल्लीचे सरकार महिलांच्या ताब्यात असण्याची परंपरा कायम ठेवली आहे. गुप्ता या दिल्लीच्या शालीमार बाग विधानसभा मतदारसंघातून पहिल्यांदाच आमदार झाल्या आहेत. पण, रेखा गुप्ता यांना दिल्लीचे मुख्यमंत्रीपदाचा मान देऊन भाजपाने एकाच वेळी अनेक संदेश दिले आहेत रेखा गुप्ता या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी जोडलेल्या नेत्या आहेत. 'अभाविप' ही भारतातील एक प्रमुख विद्यार्थी संघटना आहे, जी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संलग्न आहे. संघाच्या शिफारशीनंतर भाजपा हायकमांडने रेखा गुप्ता यांच्या नावाला मान्यता दिली. वैश्य समाजातील रेखा गुप्ता यांच्या माध्यमातून भाजपने महिला मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय, राजकीय आणि जातीय समीकरण यामुळे संतुलित होणार आहे.

### महिला मतदारांना काय संदेश?

भाजपचे धोरण आता राजधानीतील अर्ध्या लोकसंख्येला लक्ष्य करण्याचे आहे. दिल्लीची यंदाची निवडणूक महिलाकेंद्रित ठरली. निवडणुकीत महिलांचे प्रश्न महत्त्वाचे होते. भाजपा ने महिलांसाठी अनेक आश्वासने दिली होती. यामध्ये दरमहा २,५०० रुपये देण्याचे आश्वासन महत्त्वाचे होते. भाजपा ने महिलांचा आत्मविश्वास दुणावला, असे सांगण्यात येते. महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाची घोषणा केल्यानंतर, भाजपा ने रेखा गुप्ता यांच्या माध्यमातून संपूर्ण देशाला महिला सबलीकरण आणि सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश दिला आहे, देशातील नारीशक्ती भाजपासाठी किती महत्त्वाची आहे, हेच यावरून दाखवून दिले आहे.

### महिलांसाठी लोकप्रिय योजना

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपा ने एकूण ४८ जागांवर विजय मिळवला आहे. यामध्ये पक्षाला एकूण ४५.५६ टक्के मते मिळाली आहेत. तो विक्रमी बहुमताचा आकडा आहे. याचे एक प्रमुख कारण म्हणजे भाजपने महिलांसाठी अनेक योजना जाहीर केल्या होत्या. म्हणूनच भाजपने एका महिला चेहऱ्याला मुख्यमंत्री म्हणून निवडले आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर रेखा गुप्ता या सध्या भाजपा च्या एकमेव महिला मुख्यमंत्री असतील. सुषमा स्वराज, शीला दीक्षित आणि आतिशी यांच्यानंतर त्या दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री असणार आहेत.

माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याप्रमाणेच रेखा गुप्ता देखील वैश्य समुदायातील आहेत. दिल्लीमध्ये वैश्य समुदायाची व्यवसायात चांगली पकड आहे. त्यामुळे, ती नेहमीच भाजपा ची मुख्य व्होट बँक ठरली आहे. म्हणूनच भाजप पक्षश्रेष्ठींनी रेखा गुप्ता यांची निवड केली आहे. दि. ५ फेब्रुवारीला झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचा (आप) पराभव करून भाजप २७ वर्षांनी पुन्हा सत्तेत विराजमान झाला आहे.

### महिला मुख्यमंत्र्यांची परंपरा

भाजपा केंद्रीय नेतृत्वाने रेखा गुप्ता यांची मुख्यमंत्रीपदी निवड करून दिल्लीची महिला मुख्यमंत्री असण्याची परंपरा कायम राखली आहे. १९९८ मध्ये जेव्हा दिल्लीमध्ये भाजपाचे या आधीचे सरकार होते, तेव्हा सुषमा स्वराज त्या सरकारच्या कार्यकालातील शेवटच्या दोन महिने मुख्यमंत्री होत्या. त्यांच्या नंतर शीला दीक्षित सलग १५ वर्षे मुख्यमंत्री होत्या आणि या निवडणुकीच्या आधी आतिशी या पाच महिने मुख्यमंत्री होत्या. अर्थात् , हा निव्वळ योगायोग आहे. केवळ या सठी रेखा गुप्ता यांची निवड नक्कीच झालेली नाही.

### भाजपाचे निकष ठरलेले

रेखाजींची निवड करताना जे निकष लावले गेले, ते सहज समजण्यासारखे आहेत. अलीकडच्या काळात विविध राज्यात जे मुख्यमंत्री निवडले गेले, त्यांची माहिती घेतली असता सर्वात प्रमुख निकष त्या व्यक्तीची स्वच्छ प्रतिमा हा आहे. याच बरोबरीने ती व्यक्ती पक्षाची तळागाळापासून, बूथ लेव्हलपासून काम करून मोठी झालेली असणे, हा दुसरा निकष दिसतो आहे.

आधी विद्यार्थी चळवळीत आणि नंतर पक्ष संघटनेत विविध जबाबदा-यांवर काम केलेल्या रेखा गुप्ता या सलग तीन वेळा नगरसेविका होत्या. काही काळापूर्वीच त्या दिल्लीच्या एका महानगरपरिषदेच्या महापौरपदी निवडल्या गेलेल्या होत्या.

### कर्तृत्व दाखवा आणि मोठे व्हा..

भाजपा मध्ये अजूनही कोणत्याही सामान्य कार्यकर्त्याने कर्तृत्व दाखवले असेल, तर त्याची आज न उद्या महत्वाच्या पदासाठी निवड होऊ शकते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. भाजपाचे केंद्रीय नेतृत्व महिलांच्या राजकारणातील सहभागाबद्दल मनापासून प्रयत्नशील आहे हे देखील रेखा गुप्ता यांच्या निवडीवरून सिद्ध झाले आहे.

### भाजपाचे अनपेक्षित डावपेच

भाजपाचे काही अनपेक्षित डावपेच सुद्धा बघू या. ग्रामीण भागातून निवडून आलेले आणि दिवंगत माजी मुख्यमंत्री साहिबसिंग वर्मा यांचे पुत्र प्रवेश यांना उपमुख्यमंत्री करण्यात आले आहे. प्रवेश वर्मा यांनी अरविंद केजरीवाल यांचा विधानसभा निवडणुकीत पराभव केला होता. त्यांना मुख्यमंत्री करण्यात येईल अशी चर्चा होती.

### काँग्रेसच ठरली, भाजपाची 'बी टीम'

दिल्लीच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने घेतलेली भूमिका भाजपसाठी फायद्याची ठरली आहे, हे आकडेवारी सांगते. काँग्रेसची मते फक्त दोन टक्के वाढली. ही मते कदाचित 'आप' कडे गेली असती. मात्र, आप ची बरीच मते भाजपा कडे वळली आहेत. आंदोलनातून उभे राहिलेले राजकीय पक्ष दीर्घकाळ टिकाव धरु शकत नाहीत, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. आता केजरीवाल यांची विरोधी आघाडीत देखील फारशी उठबस असणार नाही. नेतृत्व करण्याच्या स्पर्धेत केजरीवाल यांना चांगला धक्का बसला आहे. आता दिल्लीत सत्ता आल्यामुळे पंतप्रधान मोदी यांचे स्थान आणखी बळकट झाले आहे. मुख्यमंत्री रेखा गुप्ता असल्या तरी राज्य चालवणे आणि टिकवणे यासाठी केंद्रीय यंत्रणा अधिक काम करेल, असे दिसते.

### डबल इंजिन सरकार, आणखी काय हवे?

पंतप्रधान मोदी यांना अपेक्षित असलेले डबल इंजिन सरकार आता दिल्लीमध्ये विराजमान झाले आहे. त्यामुळे दिल्लीचा विकास आता दुप्पट गतीने धावणार यात शंकाच नाही ! केजरीवाल म्हणा किंवा काँग्रेस म्हणा यांच्यापुढे आता पाच वर्षे टीका करणे, टोमणे मारणे याशिवाय दुसरा उद्योग पंतप्रधानांनी ठेवलेलाच नाही हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कोकाटेंची आमदारकी धोक्यात?

## नाशिक जिल्हा न्यायालयाने 2 वर्षांची शिक्षा ठोठावली

**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने २ वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. माणिकराव कोकाटे यांना २ र्षांचा कारावास आणि ५० हजारांच्या दंडाची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहे. १९९५ साली कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप माणिकराव कोकाटे यांच्यावर केला होता. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी या प्रकरणी याचिका दाखल केली होती. आता नाशिक जिल्हा न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांना शिक्षा ठोठावली आहे.**

विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा एकदा महायुती सरकार आले आहे. या नव्या सरकारच्या स्थापनेनंतर राष्ट्रवादीचे (अजित पवार) मंत्री सातत्याने वादात सापडत आहेत. वाल्मिक कराडशी संबंध असल्याचा आरोप करत विरोधक धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. अशात आता राष्ट्रवादीचे नेते व कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने २ वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा सुनावत ५०,००० रुपयांचा दंड ठोठावला आहे नाशिक जिल्हा न्यायालयाच्या या निर्णयामुळे कोकाटे अडचणीत आले असून, त्यांचे मंत्रीपद आणि आमदारकी धोक्यात आली आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंना त्यांचे पद वाचवण्यासाठी असलेल्या पर्यायांबाबत बोलताना अनंत कळसे म्हणाले, "या संदर्भात मला असं दिसतं की, सत्र न्यायालयाने त्यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे.उच्च न्यायालयात जर त्यांच्या शिक्षेला स्थगिती मिळाली तर काही प्रश्न येणार नाही, पण स्थगिती मिळाली नाही तर त्यांच्या



विधिमंडळ सदस्यत्वाला धोका पोहचू शकतो किंवा ते जाऊही शकतं अशी मला शक्यता वाटते." दरम्यान टीव्ही ९ मराठीशी बोलताना अनंत कळसे यांनी ही माहिती दिली आहे.

कारण कायद्यानुसार ज्या लोकप्रतिनिधीला दोन वर्षे किंवा त्याच्यापेक्षा जास्त कालावधीची शिक्षा होते, त्याला पदावर राहता येत नाही. असे असले तरी आपले पद वाचवण्यासाठी माणिकराव कोकाटे यांच्यासमोर काही पर्याय उपलब्ध आहेत.

याबाबत विधिमंडळाचे माजी सचिव अनंत कळसे यांनी माहिती दिली आहे.कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने २ वर्षांची शिक्षा सुनावली आहे. त्यांच्या विरोधात माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी याचिका दाखल केली होती. यात त्यांनी माणिकराव कोकाटे यांच्यावर १९९५ साली कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप केला होता. आता याप्रकरणी नाशिक जिल्हा न्यायालयात सुनावणी पार पडली.

या सुनावणीत माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे. या प्रकरणामुळे माणिकराव कोकाटे यांची आमदारकी धोक्यात येऊ शकते असे बोलले जात आहे. जर याला वरच्या कोर्टाने स्थगिती दिली नाही, तर मात्र त्यांची आमदारकी रद्द होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ यांच्या विरोधात सारकवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. १९९५ ते ९७च्या काळात सरकारच्या १० टक्के कोट्यातून कमी उत्पन्न दाखवून घर घेतल्याचा आरोपही त्यांच्यावर आहे. तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी यांनी चौकशी करून सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. गेल्या अनेक वर्षांपासून हे प्रकरण कोर्टात सुरू होते. आता यावर नाशिक जिल्हा न्यायालयाने निर्णय देत कोकाटेंना चांगलाच झटका दिला आहे.कायद्यानुसार ज्या लोकप्रतिनिधीला दोन वर्षे किंवा त्याच्यापेक्षा जास्त कालावधीची शिक्षा होते, त्याला पदावर राहता येत नाही.

### 30 वर्षांपूर्वीच्या खटल्याचा निकाल

असे असले तरी आपले पद वाचवण्यासाठी माणिकराव कोकाटे यांच्यासमोर काही पर्याय उपलब्ध आहेत. उच्च न्यायालयात जर त्यांच्या शिक्षेला स्थगिती मिळाली तर काही प्रश्न येणार नाही, पण स्थगिती मिळाली नाही तर त्यांच्या विधिमंडळ सदस्यत्वाला धोका पोहचू शकतो किंवा ते जाऊही शकतं अशी मला शक्यता वाटते. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांच्या विरोधातील हे १९९५ सालचे प्रकरण आहे. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी कोकाटे यांच्याविरुद्ध कागदपत्रांमध्ये छेडछाड केल्याचा आरोप करत फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर आता सुमारे तीस वर्षांनी या खटल्याचा निकाल लागला आहे.

# पुढच्या महिन्यात डॉलर शंभर रुपयावर

## महागाई वाढण्याचा धोका तरीही विरोधकांचे मौन: ॲड.प्रकाश आंबेडकर

**। अहिल्यानगर ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**एप्रिलपर्यंत डॉलरचा दर शंभर रूपयापर्यंत जाण्याची भीती असून यामुळे महागाई वाढण्याचा धोका आहे. तरीही विरोधक मौन पाळून गप्प आहेत अशी टीका बहुजन वंचित आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी गुरूवारी सांगलीत पत्रकार बैठकीत केली. ॲड. आंबेडकर म्हणाले, पंतप्रधान मोदी अमेरिकेला गेल्यापासून डॉलरच्या तुलनेत रूपयाची घसरण सुरू आहे. आजच्या घडीला एक डॉलरसाठी 88 रूपये मोजावे लागत आहेत. पुढील महिन्यापर्यंत डॉलरसाठी शंभर रूपये मोजावे लागतील.**



यामुळे रशिया वगळता अन्य देशातून इंधन तेल आयातीवर अधिक रक्कम मोजावी लागणार असून इंधन दरवाढीचा धोका आहे. इंधन दरवाढ होताच त्याचा परिणाम बाजारातील अन्य वस्तूंची महागाई वाढण्यावर होतो. मोदींना ट्रम्प शासनाने भारतात जो आयातकर आकारला जाईल तोच कर अमेरिकेत आकारला जाईल असे सांगण्यात आले आहे. यामुळे अमेरिकेकडून मिळणाऱ्या व्यापार सवलती बंद होण्याच्या शक्यतेने शेअर बाजार कोसळत आहे. सामान्य माणसाची क्रयशक्ती कमी झाल्याने बाजारात चलन फिरत नाही. यामुळे जीएसटी संकलनातही घट झाली असून याचा परिणाम विकास कामावर होणार आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठे संकट आले असताना विरोधक मात्र मौन पाळून गप्प आहेत. अदानीचे काय होईल ते व्यवस्था पाहून घेईल, सामान्य माणसाशी याचा संबंध नाही. मात्र, याचा बागुलबुवा उभा केला जातो आहे. वायूदलात आधुनिक यंत्रणा उपलब्ध होत नाही यामुळे चीनबरोबर युध्द झाले तर आपण जिंकू शकणार नाही असे प्रमुख सांगत आहेत. राफेल खरेदी करार मनमोहन सिंग सरकारच्या काळात करण्यात आला. मोदी सरकारने सत्ता हाती घेताच हा करार रद्द करून अदानीकडून याचा पुरवठा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला.आधुनिक यंत्रणा वायूदलाला हवी आहे, मात्र, केंद्र शासन याकडे गांभीर्याने पाहण्यास राजी नाही अशी टीकाही त्यांनी केली.

### कुंभमेळ्याचे मार्केटिंग चाललेले आहे

कुंभमेळा हा लोकांचा भावनिक, वैयक्तिक प्रश्न आहे. या कुंभ मेळाची उत्तर प्रदेश सरकारने सोय केली पण ज्या पद्धतीने कुंभमेळ्याचे मार्केटिंग चाललेले आहे त्याचा निषेध आहे. कुंभमेळ्याच्या ठिकाणी झालेल्या दुर्घटनेत एक हजाराहून अधिक लोक मृत्यूमुखी पडले, मात्र, सरकार ३८ मृत झाल्याचे सांगत संख्या लपवत आहे. हिंदू संघटनांनी मृतांच्या पार्थिवावर अंत्यविधी कसे केले हे सांगावे असे आवाहन करून ॲड. आंबेडकर म्हणाले, धर्माचे राजकारण हे देशाला आता धोक्याच्या घटकेपर्यंत पोचवत आहे. आज विरोधी पक्ष लकवा मारलेल्या परिस्थितीत गेला आहे. त्यातून त्यांनी स्वत।ला सावरत दुरुस्त करावे आणि हिटलरशाहीच्या सरकारचा विरोध करावा असेही ते म्हणाले.

# रेखा गुप्ता दिल्लीच्या मुख्यमंत्री!

## दिल्लीतील महिलांना 2500 रुपये कधीपासून मिळणार?

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून रेखा गुप्ता यांनी आज रामलीला मैदानात झालेल्या सोहळ्यात शपथ घेतली. दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचा पराभव करत भारतीय जनता पक्ष प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर सत्तेत आला आहे. या विजयानंतर आता पक्षाला निवडणूक प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वसनांची पूर्तता करावी लागणार आहे.**

यादरम्यान मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी महिलांना दरमहा २५०० रुपये आर्थिक मदत देणार असल्याचे सांगितले स्पष्ट केले आहे. त्यांनी महिलांना देण्यात येणार असलेल्या आर्थिक मदतीचा पहिला हप्ता ८ मार्चपर्यंत म्हणजेच आंतरराष्ट्रीय महिला दिनार्यंत लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा होईल असे आश्वासन गुरुवारी दिले. यावेळी त्यांनी यापूर्वीच्या दिल्लीतील आम आदमी पक्षाच्या सरकारवरही टीका केली. त्यांना त्यांच्या कार्यकाळात खर्च केलेल्या प्रत्येक पैशाचा हिशेब द्यावा लागेल, असेही रेखा गुप्ता म्हणाल्या.

दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्यापूर्वी गुप्ता यांनी काश्मिरी गेट येथील श्री मरघट वाले हनुमान मंदिराला भेट दिली, यावेळी त्या बोलत होत्या.निवडणूक काळात दिलेली आश्वासने पूर्ण करण्याच्या मुद्द्यावर भर देत गुप्ता म्हणाल्या की , "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दिल्लीसाठीचे स्वप्न अंमलात आणणे ही आमची जबाबदारी आहे.

८ मार्चपर्यंत महिलांना त्यांच्या खात्यात आर्थिक मदत मिळेल."दिल्ली विधानसभा निवडणुकीत ७० पैकी ४८ जागा जिंकून भाजपाने ऐतिहासिक विजय मिळवला आहे. या निवडणुकीत भाजपाने मिळवणाऱ्या महिलांसाठी दरमहा २,५०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते.दिल्लीतील रामलीला मैदानात झालेल्या भव्य कार्यक्रमात भाजपा नेत्या रेखा गुप्ता यांच्यासह एकूण सहा आमदारांना मंत्रीपदाची शपथ घेतली आहे.

परवेश वर्मा (नवी दिल्ली), मनजिंदर सिंग सिरसा (राजौरी गार्डन), रविंद्र कुमार इंद्रज (बवाना), कपिल मिश्रा (करवाल नगर), आशिष सूद (जनकपुरी) आणि पंकज कुमार सिंग (विकासपुरी) यांचा समावेश आहे.दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षानं अभूतपूर्व असं यश मिळवल्यानंतर मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवाराच्या रुपाने दुसरा धक्का दिला.

एकीकडे अरविंद केजरीवाल यांना पराभूत करणाऱ्या परवेश वर्मांचं नाव दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदासाठी चर्चेत असताना पक्षानं पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आलेल्या रेखा गुप्ता यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाची सूत्रं सोपवली. त्यामुळे रेखा गुप्ता व त्यांच्या कुटुंबीयांसाठी हा दुहेरी आनंद ठरला. आज रेखा गुप्ता यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्या सासू मीरा गुप्ता यांनी दिलेली प्रतिक्रिया चर्चेचा विषय ठरली आहे. दिल्लीच्या रामलीला मैदानावर रेखा गुप्ता यांचा शपथविधी सोहळा पार पडला. रेखा गुप्ता यांच्याप्रमाणेच भाजपाच्या एकूण सहा नवनिर्वाचित आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. यामध्ये परवेश वर्मा यांच्यासह मनजिंदर सिंग सिरसा (राजौरी गार्डन), रविंद्र कुमार इंद्रज (बवाना), कपिल मिश्रा (करवाल नगर), आशिष सूद (जनकपुरी) आणि पंकज कुमार सिंग (विकासपुरी) यांचा समावेश आहे. या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते.

दरम्यान, रेखा गुप्ता यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्या सासूने त्यांचं कौतुक करणारी प्रतिक्रिया एएनआयला दिली. "रेखा घरही सांभाळत होती, समाजही सांभाळत होती. तिनं दोन वर्षं संपूर्ण शालिमार सांभाळलं. तिची काम करण्याची सवय आहे. मला इतका आनंद झालाय, लोकांनी मला इतक्या शुभेच्छा दिल्यात की माझी झोळी आता त्या स्वीकारण्यासाठी कमी पडतेय", असं मीरा गुप्ता एएनआयला म्हणाल्या.दरम्यान, बुधवारी रात्री रेखा गुप्ता यांचं नाव जाहीर झाल्यानंतरदेखील मीरा गुप्ता यांनी आनंद झाल्याची प्रतिक्रिया प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली होती, "मला खूप आनंद होत आहे आता. ती राज्यासाठीही चांगलं काम करेल. रेखा गुप्ता माझ्यासाठी अजूनही माझी सूनच आहे. समाजासाठी ती मुख्यमंत्री असेल", असं त्या म्हणाल्या होत्या. एकीकडे सासूकडून रेखा गुप्ता यांना कौतुकाची थाप मिळाली असताना दुसरीकडे मुलानंही त्यांच्या कार्यक्षमतेवर दृढ विश्वास व्यक्त केला आहे.



### गुप्ता यांचं सासूकडून कौतुक!

"आम्हाला आईचा खूप अभिमान वाटतोय. गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही त्यांना काम करताना पाहिलं आहे. त्यांच्यावरचा सगळा ताण पाहिला आहे. आम्हाला ते पाहून कळतं की राजकारण किती अवघड गोष्ट आहे. त्यांनी स्वतःच्या हिंमतीवर हे यश मिळवलं आहे. आम्हाला त्यांचा फार अभिमान वाटतो. मला माझ्या आईवर, पक्षावर पूर्ण विश्वास आहे", अशी प्रतिक्रिया रेखा गुप्ता यांचा मुलगा निकुंज गुप्ता यानं दिली आहे.दरम्यान, रेखा गुप्ता यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्या सासूने त्यांचं कौतुक करणारी प्रतिक्रिया एएनआयला दिली. "रेखा घरही सांभाळत होती, समाजही सांभाळत होती. तिनं दोन वर्षं संपूर्ण शालिमार सांभाळलं.

---

# मोदींच्या पदवीचा वाद दिल्ली उच्च न्यायालयात

## एखाद्याला पदवी देणं ही वैयक्तिक नसून बाब सार्वजनिक बाब

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पदवीची माहिती जाहीर केली जात नसल्याचा मुद्दा उपस्थित करत थेट दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर बुधवारी झालेल्या सुनावणीदरम्यान दिल्ली विद्यापीठाच्या निर्णयाविरोधात याचिकाकर्त्यांकडून परखड युक्तिवाद करण्यात आला.**




एखाद्या व्यक्तीला पदवी देणं, ही खासगी बाब नसून सार्वजनिक बाब आहे, असा मुद्दा उपस्थित करत पदवीची माहिती न देण्याच्या विद्यापीठाच्या निर्णयावर याचिकाकर्त्यांकडून तीव्र आक्षेप घेण्यात आला पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दिल्ली विद्यापीठातून १९७८ साली उत्तीर्ण झाल्याचं सांगितलं जातं. मात्र, त्यांच्या पदवीची माहिती मिळावी, अशी मागणी करणारा अर्ज इरशाद नामक माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी केला होता. यामध्ये १९७८ साली उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती व गुणपत्रिका मिळावी, अशी विनंती करण्यात आली आहे. केंद्रीय माहिती आयोगानं २१ डिसेंबर २०१६ रोजी ही माहिती अर्जदाराला मिळावी असे निर्देश दिले. मात्र, दिल्ली विद्यापीठाच्या मागणीनंतर उच्च न्यायालयाने २३ डिसेंबर २०१७ रोजी केंद्रीय माहिती आयोगाच्या आदेशाला स्थगिती दिली. आता हे प्रकरण पुन्हा सुनावणीसाठी आलं असून बुधवारी त्यासंदर्भात याचिकाकर्त्यांकडून वकील शादान फरासत यांनी युक्तिवाद केला. "दिल्ली विद्यापीठ ही एक सार्वजनिक संस्था आहे. त्यामुळे ती माहिती अधिकाराच्या कक्षेत येते. एखाद्याची पदवी ही त्याला मिळणारी सवलत असून त्याचा तो अधिकार नाही. मला शासनानं काही आवश्यक निकषांच्या पूर्ततेसाठी ती पदवी दिलेली असते.

### दिल्ली विद्यापीठानं पदवी दिली

त्यामुळे पदवी देणं ही एक सार्वजनिक कृती आहे. संबंधित व्यक्तीची शैक्षणिक पात्रता दर्शवण्यासाठी ती दिली जाते. त्यात वैयक्तिक वा खासगी असं काहीही नाही. मला स्वतःसाठी पदवी नको असते, ती एक सार्वजनिक कृती आहे", असं फरासत न्यायालयात म्हणाले."ही एक माहिती आहे. दिल्ली विद्यापीठानं ती तयार केली आहे. दिल्ली विद्यापीठानं पदवी दिली आहे, संबंधित व्यक्तीनं दिल्ली विद्यापीठाला पदवी दिलेली नाही. शिवाय या प्रकरणात अमुक व्यक्तीलाच ही माहिती का हवी आहे? हा प्रश्नही गैरलागू आहे.

# मध्य प्रदेशनंतर गोव्यातही छावा टॅक्स फ्री




छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर आधारित 'छावा' चित्रपट सध्या जगभरात चर्चेत आहे. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित हा चित्रपट शुक्रवारी १४ फेब्रुवारीला रिलीज झाला, तेव्हापासून कमाईचे रेकॉर्ड मोडत आहे. अवघ्या ३ दिवसांत या चित्रपटाने बजेटची रक्कम वसूल केली, तर ६ दिवसांत २०० कोटींचा टप्पा पार केला आहे. हा चित्रपट आता टॅक्स फ्री करण्याची मागणी होत आहे. महाराष्ट्रात अद्याप 'छावा' चित्रपट टॅक्स फ्री झाला नाही, पण दोन राज्यांनी तो टॅक्स फ्री केला आहे.मध्य प्रदेश सरकारने राज्यात 'छावा' टॅक्स फ्री करण्याचा निर्णय घेतला. त्यापाठोपाठ आता गोव्यात 'छावा' टॅक्स फ्री करण्यात आला आहे. गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी एक्सवर एक पोस्ट करून ही घोषणा केली आहे.

# 'ठरलं तर मग' मालिका पुन्हा अव्वलस्थानी!

'ठरलं तर मग' मालिकेत अर्जुन-सायलीचं पुन्हा एकदा लग्न झालं असून, दोघंही सुभेदारांच्या घरात आपलं स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत असल्याचं पाहायला मिळत आहे. अर्जुन-प्रियाच्या लग्नात सायली अचानक एन्ट्री घेते आणि आपल्याच नवऱ्याशी पुन्हा एकदा लग्न करते. मात्र, या लग्नापासून सुभेदार आनंदी नसतात. ते सायलीला घरातून हाकलून लावतात, तिचा गृहप्रवेश करत नाहीत. पण, अर्जुन तिला घरात घेऊन येतो. आपल्या बायकोला पुन्हा एकदा मानाचं स्थान मिळवून द्यायचं असा निश्चय अर्जुनने केलेला आहे. गेल्या काही दिवसांपासून 'ठरलं तर मग' मालिकेत नवनवीन ट्विस्ट आल्याचं पाहायला मिळालं. यामुळे प्रेक्षकांच्या मनात सुद्धा आता पुढे काय होणार याबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती. याशिवाय आता ही मालिका अर्धा तास प्रसारित न करता रोज ८:१५ ते ९:०० अशी पाऊणतास प्रक्षेपित केली जाते. या सगळ्याचा सकारात्मक परिणाम मालिकेच्या टीआरपीवर झाला. 'ठरलं तर मग' मालिकेला पुन्हा एकदा रेकॉर्ड ब्रेकिंग टीआरपी मिळाला आहे.'ठरलं तर मग' मालिका गेल्या काही आठवड्यांमध्ये टीआरपीच्या शर्यतीत दुसऱ्या स्थानी गेली होती. पण, मालिकेच्या टीमने भरपूर मेहनत घेऊन पुन्हा एकदा त्यांचं अव्वलस्थान पटकावलं आहे. 'ठरलं तर मग' मालिकेला गेल्या आठवड्यात ७ टीआरपी रेटिंग मिळालं आहे. सध्याच्या काळात टेलिव्हिजन मालिकेला ७ रेटिंग मिळणं ही मोठी गोष्ट आहे. त्यामुळे सर्व स्तरांतून 'ठरलं तर मग'वर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# तुम नज़रें ठीक करो!



प्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी ही सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करत असते. हेमांगीच्या 'बाई, बुब्स आणि ब्रा' या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधलं होते. हेमांगी विविध विषयांवर आधारित पोस्ट शेअर करत असते. आता हेमांगीनं जागतिक महिला दिनानिमित्त खास पोस्ट शेअर केली आहे. हेमांगीनं या पोस्टमध्ये स्वत:चा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये हेमांगी ही खिडकीच्या बाहेर दिसताना दिसत आहे. हेमांगीनं तिच्या या फोटोला खास कॅप्शन देखील दिलं आहे. या कॅप्शनमध्ये तिनं परीतोष त्रिपाठी यांची कविता लिहिली आहे. या कवितेनं अनेकांचे लक्ष वेधलं आहे.पुढे हेमांगीनं पोस्टमध्ये लिहिलं, "परीतोष त्रिपाठी जियो! कल के दौरान आपने ये पंक्तियां पेश की और मेरी आंखें भर आयी. इसमें वो हर एक शब्द है, है, जो मैं पिछले कुछ दिनों से कहना चाहती थी, जोर जोर से चिल्लाना चाहती थी! कुछ लोगों के लिए औरतों की किसी भी क्षेत्र में पायी गयी कोई मायने ही नहीं रखती. ऐसे लोग सिर्फ और सिर्फ उसने कपडे क्या पहने हैं, कैसे पहने हैं इस बात पर वक्त निकाल निकाल के बाते करते हैं, करते हैं, अपना और दुसरों का वक्त जाया करते हैं!के जरीए संस्कृती और सभ्यता के नाम पर हमें फिरसे गुलाम, कमजोर बनाना चाहते हैं!

# नम्रताने सांगितला 'तो' अनुभव

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमातून आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे नम्रता संभेराव. नम्रताने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं. आता ती वेगवेगळ्या चित्रपटात, नाटकात विविधांगी भूमिका साकारताना दिसत आहे. नुकतीच नम्रता संभेरावने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. ज्यामध्ये तिने 'झी चित्र गौरव २०२५'चा सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाल्यानंतरचा अनुभव लिहीला आहे. नम्रता संभेरावने पुरस्काराबरोबरचे काही फोटो शेअर करत लिहिलं आहे, "...आणि ते 'झी चित्र गौरव'चं गाणं वाजलं माझ्यासाठी, सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेत्री नम्रता संभेराव चित्रपट 'नाच गं घुमा' त्या क्षणी पोटात गोळा आला. आनंद, सुख, समाधान सगळं एकवटून आलं. हे लहानपणी टीव्हीवर बघितलं होतं, कोणाला पारितोषिक मिळालं की डोळ्यात पाणी यायचं. मग ते अनोळखी असलं तरी आणि तो दिवस माझ्या आयुष्यात आला."पुढे नम्रताने लिहिलं की, भरत जाधव सरांनी नाव पुकारलं नमु, अंगावर सरसरून काटा आला. विनोदाचे महारथी भरत जाधव सरांकडून मला पुरस्कार मिळाला, खूपच भारी वाटलं. समोर विनोदाचे बाप बसले होते, अशोक सराफ, सचिन पिळगांवकर, महेश कोठारे काय बोलावं साठवून ठेवावा असा क्षण. २० वर्षं झाली, सिने नाट्यसृष्टीत छोट्या मोठ्या भूमिका करत इथंवर पोहोचले. गर्दीतून हळूहळू अनेक अनुभवांसह शिकत स्वतःला पुढे ढकलत आज प्रमुख भूमिकेसाठी बक्षीस मिळवलं. प्रामाणिकपणे कलेवर प्रेम केलं, करत राहीन."'झी चित्र गौरव'च्या सर्व परीक्षकांचे मनापासून आभार. आशाच्या भूमिकेसाठी ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला ते म्हणजे परेश मोकाशी, मधुगंधा कुलकर्णी या दोन अत्यंत हुशार हरहुन्नरी व्यक्तींनी. तुमचे सुद्धा खूप खूप आभार. मुक्ता ताई माझं प्रेरणास्थान तुझेही आभार. 'नाच गं घुमा'च्या सगळ्या समूहाचे, निर्मात्यांचे मनापासून आभार. या सगळ्यात तुमचाही मोठा वाटा आहे आणि प्रेक्षकांचे देखील मनापासून आभार," असं नम्रता संभेरावने लिहिलं.दरम्यान, नम्रता संभेरावच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ती लवकरच प्रदर्शित होणाऱ्या प्रसाद खांडेकर दिग्दर्शित 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटात झळकणार आहे. २८ फेब्रुवारीला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात तिचा कॅमिओ असणार आहे. याशिवाय दुसऱ्या बाजूला तिच्या 'थेट तुमच्या घरातून' नाटकाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. या नाटकात नम्रतासह प्रसाद खांडेकर, ओंकार राऊत, शिवाली परब, प्रथमेश शिवलकर आणि भक्ति देसाई आहे.'महाराष्ट्राची हास्यजत्रा' कार्यक्रमातून आपल्या विनोदी शैलीने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे नम्रता संभेराव. नम्रताने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं.

# जिनिलीयाच्या व्हिडीओवर नेटकऱ्यांच्या प्रतिक्रिया

अभिनेता रितेश देशमुखव जिनिलीया देशमुख हे महाराष्ट्राचे लाडके दादा वहिनी आहेत. चाहते त्यांना दादा वहिनी असे म्हणताना दिसतात. या सेलेब्रिटी जोडप्याचा चाहतावर्ग मोठा आहे. चित्रपटांबरोबरच त्यांच्या सोशल मीडियावरील व्हिडीओंना प्रेक्षकांचे प्रेम मिळताना दिसते. ते अनेकदा विनोदी रीलमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करतात. आता हे जोडपे एका रीलच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या या रीलवर अनेक चाहत्यांनी अनेक कमेंट केल्या आहेत. रितेश देशमुख व जिनिलीया देशमुख यांनी सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. यावर लग्न म्हणजे काय? असे लिहिलेले दिसत आहे. जिनिलीया रितेशला म्हणते, "अहो लग्न म्हणजे काय हो?", त्यावर रितेश म्हणतो, "अगं लग्न म्हणजे घोड्यावर बसून केलेला गाढवपणा", या वाक्यानंतरच्या त्याच्या चेहऱ्यावरील हावभाव लक्ष वेधून घेत आहेत. तो घाबरल्याचे दिसत आहे. तर जिनिलीया त्याच्याकडे डोळे मोठे करून बघत असल्याचे दिसत आहे. शेवटी 'काय मी बोलून गेलो'हे गाणे ऐकायला मिळत आहे. रितेश-जिनिलीयच्या या व्हिडीओवर चाहत्यांनी मजेशीर कमेंट केल्याचे पाहायला मिळत आहे.रितेश-जिनिलीयाच्या या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका नेटकऱ्याने, "आता काही खरं नाही", असे म्हणत हसण्याच्या इमोजी शेअर केल्या आहेत. दुसऱ्या एका नेटकऱ्याने कमेंट करीत लिहिले, "आजचा दिवस जाउद्या वाहिनी", आणखी एका नेटकऱ्याने म्हटले, "आता सुट्टी नाही", असे म्हणत हसणाऱ्या इमोजी शेअर केल्या आहेत. अनेक नेटकऱ्यांनी आणखी काही मजेशीर कमेंट केल्या आहेत. "भाऊ आज उपाशी झोपणार", "दादाचं काही खर नाही हो आता","रितेश भाऊ जेवायला मिळतंय ना", "दादा आता जेवण विसरा", "आज जेवण मिळणार नाही","खतम टाटा बाय बाय", अशा भन्नाट कंमेट्स पाहायला मिळणार आहे.चाहत्यांसह काही कलाकारांनीदेखील यावर कमेंट केल्या आहेत. अभिनेत्री भाग्यश्रीने रितेश-जिनीलियाच्या व्हिडीओवर कमेंट करीत, "तुम्ही दोघे खूप क्यूट आहात", असे म्हटले आहे. अभिनेत्रीने त्यांचे कौतुक केले आहे. तर सुयश टिळकने हसण्याच्या इमोजी शेअर केल्या आहेत. याबरोबरच, प्रसिद्ध युट्यूबर अर्थव सुदामेनेदेखील हसण्याच्या इमोजी शेअर केले आहेत.दरम्यान, आता रितेश देशमुख व जिनिलिया कोणत्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. अभिनेता रितेश देशमुखव जिनिलीया देशमुख हे महाराष्ट्राचे लाडके दादा वहिनी आहेत. चाहते त्यांना दादा वहिनी असे म्हणताना दिसतात. या सेलेब्रिटी जोडप्याचा चाहतावर्ग मोठा आहे. चित्रपटांबरोबरच त्यांच्या सोशल मीडियावरील व्हिडीओंना प्रेक्षकांचे प्रेम मिळताना दिसते.



# भारताची चॅम्पियन्स ट्रॉफीत 'शुभ' सुरुवात

## गिलच्या शतकासह बांगलादेशवर मिळवला शानदार विजय

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शुबमन गिलचं शतक, केएल राहुलचा विजयी षटकार आणि मोहम्मद शमीचे ५ विकेट्स... यासह भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील पहिल्याच सामन्यात बांगलादेशवर ६ विकेट्सने शानदार विजय मिळवला. बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना २२८ धावा केल्या. तर भारताने लक्ष्याचा पाठलाग करताना ६ विकेट्सने आणि २१ चेंडू शिल्लक ठेवत जबरदस्त विजयाची नोंद केली. शुबमन गिल, मोहम्मद शमी हे भारताच्या विजयाचे हिरो ठरले.**




शुबमन गिल पहिल्यांदाच आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा खेळत आहे आणि या स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात त्याने शतक झळकावत आपल्या कामगिरीची छाप पाडली आहे. सलामीसाठी उतरलेला गिल भारताला विजय मिळवून देतच माघारी परतला. गिलने १२९ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद १०१ धावा केल्या. उपकर्णधार असलेल्या शुबमन गिलने भारताच्या डावाची जबाबदारी घेत विजय मिळवून दिला.तर मोहम्मद शमीने मोठ्या कालावधीनंतर भारतीय संघात पुनरागमन केले. पण आयसीसीने टूर्नामेंटमध्ये पाऊल ठेवताच शमीचा तोच वादळी फॉर्म पुन्हा पाहायला मिळाला. शमीने बांगलादेशच्या डावात ५ विकेट्स घेत आपल्या भेदक गोलंदाजीचा प्रत्यय दाखवून दिला. शमीने १० षटकांत ५३ धावा देत ५ विकेट्स घेतले.बांगलादेशने दिलेल्या २२९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी रोहित शर्मा आणि शुबमन गिलची जोडी मैदानात उतरली. रोहित शर्मा झटपट खेळी करत ७ चौकारांसह ४१ धावा करत बाद झाला. तर विराट कोहली २२ धावा, श्रेयस अय्यर १५ धावा, अक्षर पटेल ८ धावा करत बाद झाले. विराट, श्रेयस आणि अक्षरचे लागोपाठ विकेट गेल्यानंतर भारतीय संघ आता पेचात अडकतो की काय, अशी स्थिती निर्माण झाली. पण नंतर आलेल्या केएल राहुलने गिलबरोबर संघाचा डाव सावरत विजयाकडे नेले.केएल राहुलचा एक सोपा झेल सोडल्यानंतर राहुलने गियर बदलत गिलबरोबर वेगवान खेळी केली. राहुलने ४७ चेंडूत २ षटकार आणि एका चौकारासह ४१ धावा केल्या. तर शुबमन गिल शतकी खेळी करत नाबाद माघारी परतला. बांगलादेशकडून रिशाद हुसैनने २ तर मुस्तफिजूर आणि तस्किन यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली. तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णयही बांगलादेशसाठी योग्य ठरला नाही. बांगलादेशच्या संघाने ५ विकेट्स गमावत फक्त ३ धावा केल्या होत्या. पहिल्या आणि दुसऱ्या षटकात सलग २ विकेट गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीचा निर्णय चुकीचा ठरल्याचे दिसून आले. ९व्या षटकापर्यंत, संघाने केवळ ३५ धावांमध्ये ५ विकेट गमावल्या होत्या.

### चेल सँटनरने 3 विकेट घेतले

शमीने २ विकेट घेतल्या होत्या. ९व्या षटकात अक्षर पटेलने लागोपाठ २ विकेट घेतल्या मात्र रोहित शर्माने जकीर अलीचा झेल सोडल्याने अक्षर हॅटट्रिक घेऊ शकला नाही.रोहितच्या कॅच ड्रॉपचा फटका टीम इंडियाला बसला. जकीर अलीने तौहीद हृदयसह सहाव्या विकेटसाठी १५४ धावांची शानदार भागीदारी करत संघाटा डाव सावरला. यादरम्यान हार्दिक पंड्यानेही झेल सोडत तौहीदला दिलासा दिला. त्यावेळी तो केवळ २३ धावांवर खेळत होता. पण दोन्ही फलंदाजांनी याचा फायदा घेतला आणि या शानदार भागीदारीसह त्यांनी संघाला स्पर्धात्मक स्थितीत आणले. जकीरला बाद करून शमीने एकदिवसीय क्रिकेटमधील २०० विकेट पूर्ण केले. तर तौहीदने एकदिवसीय क्रिकेटमधील पहिले शतक पूर्ण करून तो दिवस संस्मरणीय बनवला.

# 'कुछ तो लोग कहेंगे, लोगों का काम है कहना

## आयपीएल 2025 च्या आधी धोनी आला प्रसिद्धीच्या झोतात

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएल २०२५ च्या आधी माजी भारतीय कर्णधार महेंद्रसिंग धोनी प्रसिद्धीच्या झोतात आला आहे. काही दिवसांनी चाहत्यांना चेन्नई सुपर किंग्जच्या माजी कर्णधाराला पुन्हा मैदानावर पाहता येईल. आयपीएल सुरू होण्यापूर्वी धोनीने तणावमुक्त आयुष्य जगण्याचे त्याचे गुपित सांगितले आहे. दिवंगत अभिनेते राजेश खन्ना यांच्या 'अमर प्रेम' चित्रपटातील एक प्रसिद्ध गाणे म्हणजे 'कुछ तो लोग कहेंगे, लोगों का काम है कहना'.**



धोनीने हे गाणे त्याच्या आयुष्यात खूप समाविष्ट केले आहे. त्याने जीवन जगण्याबद्दल जे म्हटले आहे त्यावरून असे दिसते. धोनी म्हणाला की जरी ते करणे कठीण असले तरी, एखाद्याने क्षमा करावी आणि पुढे जावे. त्याने स्वतःला एक निश्चिंत व्यक्ती म्हणून देखील वर्णन केले, जे इतर लोक त्याच्याबद्दल काय विचार करतात याची काळजी करण्यात आपली रात्रीची झोप वाया घालवत नाही.

ज्याने आपल्या शानदार आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत भारताला दोन विश्वचषक जिंकून दिले, त्याला खेळातील महान खेळाडूंपैकी एक मानले जाते. अलीकडेच एका कार्यक्रमात धोनीला चाहत्यांना जीवन जगण्याबद्दल सल्ला देण्यास सांगण्यात आले, म्हणून तो तत्वज्ञानी बनला. यष्टिरक्षक-फलंदाज म्हणाला, "मी आयुष्य साधे ठेवण्यावर विश्वास ठेवतो. स्वतःशी प्रामाणिक राहा, लोक तुमच्यासाठी जे काही करत आहेत त्याबद्दल त्यांचे आभार माना. नेहमी 'हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असे विचार करू नका आणि अधिक मागू नका.यावेळी भारताचा जखमी यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसन देखील उपस्थित होता. धोनी म्हणाला, "मला माहित आहे की संपूर्ण ॲप (धोनी) 'थोडे अजून' म्हणते, परंतु संपूर्ण गोष्ट कृतज्ञता बाळगणे, धन्यवाद म्हणणे, मोठ्यांचा आदर करणे (आणि) लहानांना प्रेम देणे याबद्दल आहे." यानंतर, धोनीने क्षमा करण्याच्या प्रवृत्तीवर भर दिला, ज्याची त्याला वाटते की लोकांमध्ये अजूनही कमतरता आहे.धोनी म्हणाला, "मला नेहमीच वाटतं की चेहऱ्यावर हास्य असण्याने ही अर्धी समस्या मिटली जाते. जरी तुम्ही आरामदायी परिस्थितीत नसलात, जरी ते करणे कठीण असले तरी, तुमच्यात क्षमा करण्याची ताकद असली पाहिजे. धोनीने कधीही त्याच्यावर झालेल्या वैयक्तिक हल्ल्यांना उत्तर दिले नाही, ज्यामध्ये माजी सहकारी किंवा टीकाकारांचाही समावेश आहे, ज्यांपैकी काहींनी त्याच्यावर त्यांच्या कारकिर्द संपवण्याचही आरोप केला आहे.माजी भारतीय कर्णधार म्हणाला, "आपण खूप सूड घेणारे लोक झालो आहोत. तो मला असं म्हणाला, मी त्याला तसं म्हणालो... फक्त माफ करा, पुढे जा, आयुष्यात आनंदी राहा. कारण आपण काहीही करतो... जेव्हा आपण मोठे होत होतो तेव्हा आपल्याला आयुष्यात नेहमीच आनंदी राहायचे होते." धोनी म्हणाला की काही गोष्टींबद्दल काळजी न करता राहिल्याने दैनंदिन जीवनातील दबाव संतुलित होण्यास मदत होते.

### 'तुम्ही निष्काळजी राहू शकत नाही'

धोनी म्हणाला, "मला नेहमीच वाटतं की चेहऱ्यावर हास्य असण्याने ही अर्धी समस्या मिटली जाते. जरी तुम्ही आरामदायी परिस्थितीत नसलात, जरी ते करणे कठीण असले तरी, तुमच्यात क्षमा करण्याची ताकद असली पाहिजे. हे असे काहीतरी आहे जे आपल्यापैकी बऱ्याच जणांकडे नाही." धोनीने कधीही त्याच्यावर झालेल्या वैयक्तिक हल्ल्यांना उत्तर दिले नाही, ज्यामध्ये माजी सहकारी किंवा टीकाकारांचाही समावेश आहे, ज्यांपैकी काहींनी त्याच्यावर त्यांच्या कारकिर्द संपवण्याचही आरोप केला आहे.एमएस धोनी पुढे म्हणाला, "आपल्या सर्वांनाच दबाव जाणवतो. आपल्याला नेहमीच वाटतं की त्याचं आयुष्य चांगलं आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
। दि. 21 फेब्रुवारी 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## अर्थसंकल्पात आयुक्तांची सहकार्याची भूमिका

# पिंपरी-चिंचवड पालिकेचा आज अर्थसंकल्प!

### उद्योग विश्व : अर्थसंकल्पात औद्योगिक परिसरासाठी विशेष तरतूद करा; उद्योजकांची मागणी

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महापालिकेच्या आगामी (२०२५-२६) अर्थसंकल्पामध्ये औद्योगिक परिसरातील अंतर्गत रस्ते, वाहन तळ, ई-टॉयलेट, जलनिस्सारण वाहिनी अशा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच, पर्यावरण संस्कार उद्यानात जॉगिंग पार्क, खुली व्यायामशाळा, ध्यान केंद्र सेंटर उभारण्यासाठी विशेष तरतूद करण्यात यावी, अशी मागणी फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनने महापालिकेकडे केली आहे.**



असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील उद्योजकांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेऊन त्यांना याबाबत निवेदन दिले. आगामी अर्थसंकल्पाबाबत उद्योजकांनी आयुक्तांना अनेक सूचना केल्या. या सूचनांमध्ये औद्योगिक परिसरामध्ये मोठ्या चौकांचे विस्तारीकरण करून अंतर्गत रस्ते करावेत. सुसज्ज वाहन तळ उभारावे. युवा स्टार्टअप उद्योजक आणि उद्योजिकांसाठी कौशल्य विकास केंद्र आणि उद्योग भवन उभारावे. टी ब्लॉक येथे पर्यावरण संस्कार उद्यानात जॉगिंग पार्क, कामगार वर्गासाठी आणि उद्योजकांसाठी खुली व्यायामशाळा, ध्यान केंद्र सेंटर तयार करण्यात यावे. उद्यानाची दुरावस्था झालेली असून त्यामध्ये सुधारणा करावी. उद्योजकांना आणि कामगारांसाठी सुसज्ज वाचनालय उपलब्ध करून द्यावे. एमआयडीसीमध्ये अंतर्गत भागात कामगारांना विशेषतः महिला वर्गाला ये-जा करण्यासाठी रिक्षा वाहतुकीची सोय करण्यात यावी. त्यासाठी महापालिकेने येणाऱ्या अर्थसंकल्पात विशेष तरतूद केल्यास उद्योजकांच्या समस्या सुटण्यास मोलाची मदत होईल, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. या मागण्यांबाबत आयुक्तांनी सहकार्याची भूमिका घेऊन येणाऱ्या अर्थसंकल्पात नक्कीच विचार केला जाईल, अशी ग्वाही दिल्याचे भोर यांनी सांगितले.

### तिसऱ्या वर्षी प्रशासकच सादर करणार अर्थसंकल्प

पिंपरी : महापालिकेचा २०२५-२६ या आर्थिक वर्षांचा अर्थसंकल्प प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह स्थायी समितीला सादर करणार आहेत. महापालिकेचा ४३ वा अर्थसंकल्प असून सलग तिसऱ्या वर्षी प्रशासकच अर्थसंकल्प सादर करणार आहेत. या अर्थसंकल्पात शहरवासीयांसाठी कोणत्या योजना, प्रकल्प असणार याची नागरिकांना उत्सुकता असणार आहे. महापालिकेच्या लेखा व वित्त विभागाकडून २०२५-२६ चा अर्थसंकल्प तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यासाठी विविध कामे, तरतुदींबाबत विभागनिहाय अधिकाऱ्यांच्या बैठका सुरू आहेत. सर्व विभागप्रमुखांची बैठक घेऊन अर्थसंकल्पाला अंतिम रूप देण्याचे काम सुरू आहे. यंदाचा ई-अर्थसंकल्प असणार आहे. अर्थसंकल्पात केंद्र शासनाच्या पुरस्कृत विविध योजना, प्रशासकीय सुविधा, विविध विकासकामे, आरोग्य, स्थापत्यविषयक कामे, शहरातील नागरिकांसाठी पायाभूत सुविधा, तसेच विविध विकासकामांसाठी अत्यावश्यक निधी, तरतुदी, महसूल आदी बाबींचा तपशील देण्यात येणार आहे.

---

## उपक्रमशील शाळा, गुणवंत मुख्याध्यापक, शिक्षक भव्य सन्मान सोहळा उत्साहात

### शिक्षण विश्व: IB करिअर इन्स्टिट्यूट, पिंपरी-चिंचवड आणि पुणे यांच्या सौजन्याने स्तुत्य उपक्रम

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ, पुणे जिल्हा परिषद (शिक्षण विभाग) आणि IIB करिअर इन्स्टिट्यूट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. IIB करिअर इन्स्टिट्यूट, पिंपरी-चिंचवड आणि पुणे यांच्या सौजन्याने मॉर्डन हायस्कूल, यमुनानगर, निगडी, पुणे-४४ येथे हा भव्य सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात पिंपरी, चिंचवड व भोसरी परिसरातील सुमारे 90 हुन अधिक शाळा सहभागी झाल्या असून मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या उत्कृष्ट कार्याचा गौरव करत प्रमाणपत्रे व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली.**



कार्यक्रमाची प्रमुख उपस्थिती कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. डॉ. श्रीपाल सबनीस (अध्यक्ष, ९२ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन) आणि मा. श्री. डॉ. भाऊसाहेब कारेकर (शिक्षणाधिकारी, माध्यमिक, पुणे जिल्हा परिषद) यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी मा. श्रीम. संगीता बांगर (घोडेकर) (प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिं. चिं. मनपा), प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय, मा. श्री. प्रसाद गायकवाड (सचिव, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ), मा. श्री. नंदकुमार सागर (अध्यक्ष, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ व सचिव, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महासंघ) हे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात श्री. संभाजी पडवळ (अध्यक्ष पिंपरी चिंचवड मुख्याध्यापक संघ) श्री. सुबोध गलांडे (सचिव, पिंपरी-चिंचवड मुख्याध्यापक संघ) आणि यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यावेळी कार्यक्रमाचे आयोजक मा. ॲड. श्री. महेश लोहारे, (संचालक) व मा. श्री. दैविक मंठाळे (सहसंचालक, IIB करियर इन्स्टिट्यूट, पुणे) हेही उपस्थित होते.

**शिक्षकांचे आभार व समाजासाठी त्यांचे योगदान**

शिक्षक हा समाज घडवणारा आधारस्तंभ असतो आणि त्यांचे योगदान अपरिमित आहे. त्यांच्या सन्मानाने त्यांच्यात नवीन ऊर्जा संचारेल आणि शिक्षण क्षेत्रात अधिक गुणात्मक सुधारणा घडतील, असा विश्वास डॉ. श्रीपाल सबनीस यांनी त्यांच्या भाषणातून व्यक्त केला. "आज सरकार जे काम करत नाही ते IIB इन्स्टिट्यूट करत आहे".


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


WTE
Provider of Sustainable
Water and Waste Water Treatment Solution Globally


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
TOMORROW'S
LEADERS
ARE MADE HERE
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
779 676 7292
BRANCHES AT: DHANORE | CHARHOLI | MOSHI